REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2022

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे बदलते स्वरूप

प्रा.डॉ. आयेशा एम. रंगरेज[१] , डॉ. सुकेशिनी अंकुश जानराव[२]
[१]कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.
[२]कॉलेज ऑफ एज्युकेशन घारगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

## प्रस्तावना :-




व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी, सामाजिक व मानवी मूल्यांच्या विकासासाठी आदर्श शिक्षण पद्धतीची आवश्यकता असल्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार झाला. परंतु इंदिरा गांधींच्या निधनाने राजकीय परिवर्तन होऊन भारताच्या पंतप्रधानपदी स्व. राजीव गांधी आले. त्यांनी ५ जाने., १९८५ ला आपल्या भाषणात राष्ट्राला एकविसाव्या शतकाकडे घेवून जाण्यासाठी सक्षम नवीन शैक्षणिक धोरण देण्याचे अभिवचन दिले. शिक्षण मंत्रालयांनी २० ऑगस्ट, १९८५ ला 'शैक्षणिक आव्हान : एक धोरणात्मक यथार्थदर्शन' हा अहवाल प्रसिद्ध केला व देशाभरातील शिक्षणतज्ज्ञ व अन्य लोकांकडून त्यावर मते, विचार आजमाविण्यात आली. सर्व राज्यामधील चर्चासत्रे, कार्यशाळा, परिसंवाद यातून 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ ' अस्तित्त्वात आले.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ :-

राष्ट्रीय एकात्मता, वैज्ञानिक दृष्टीकोन, उपयुक्त मनुष्यबळ, स्वावलंबी राष्ट्र या बाबीच्या पूर्ततेसाठी राष्ट्रीय शिक्षणाची गरज असल्याचे लक्षात आले. शिक्षण ही उत्तम गुंतवणूक असल्याने शिक्षणाची उद्दिष्टे ठरविणे क्रमप्राप्त झाले. मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणारे शिक्षण निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये समानतेसाठी शिक्षण, विविध स्तरावर शिक्षणाची पुनर्रचना, तांत्रिक व व्यवस्थापन विषयक शिक्षण, शिक्षणाचा आशय व शैक्षणिक प्रक्रिया, शिक्षण, साधन संपत्ती, भवितव्य या बाबींचा विचार करून शिक्षणाची उद्दिष्टे ठरविण्यात आली. आपण यांपैकी माध्यमिक शिक्षणासाठी उद्दिष्टे, शिफारशी व परिणाम याचा अभ्यास करणार आहोत. प्रथम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये शिक्षणाची कोणती उद्दिष्टे स्पष्ट केली आहेत ते पाहू

## उद्दिष्टे -

१. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे.
२. लोकशाहीस पूरक मूल्यांची रुजवणूक करणे.
३. धैर्य व नवनिर्माण क्षमता विकसित करणे.
४. शिक्षणासाठी पूरक व्यवस्था निर्माण करणे.
५. श्रमप्रतिष्ठेचा आदर बाळगण्याची वृत्ती वाढविणे.

६. धर्मनिरपेक्षतेतून सर्व धर्माबद्दल आदर निर्माण करणे.
७. राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यास प्रेरणा देणे.
८. एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करण्यासाठी तंत्रज्ञानाची आवड निर्माण करणे.
९. सर्व क्षेत्रात आधुनिकीकरण आणण्याचा प्रयत्न वाढविणे.
१०. लोकांचे जीवनमान उंचाविणे,
११. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सामंजस्याचा विकास करणे.
१२. मूल्य संवर्धनातून चारित्र्यनिर्मितीला प्राधान्य देणे.
१३. व्यावसायिक शिक्षणातून राष्ट्राला स्वावलंबी बनविणे.

या व इतर अनेक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी माध्यमिक शिक्षणासाठी कोणत्या शिफारशी या धोरणाने स्पष्ट केल्या आहेत ते अभ्यासू.

**शिफारशी :-**

१. माध्यमिक स्तरावर सर्वांना चांगल्या प्रतिचे शिक्षण मिळावे.
२. विशेष प्रज्ञावंतांसाठी नवोदय विद्यालये सुरू करावीत. त्यात ग्रामीण भागातील बुद्धिमान विद्यार्थ्यांना शिकण्याची व एकत्र राहण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.
३. विशेष शाळांना नवीन उपक्रम व प्रयोग करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य द्यावे.
४. माध्यमिक शाळांना शालेय सुविधांचा पुरवठा करावा.
५. माध्यमिक शिक्षकांच्या क्षमता वाढवाव्यात.
६. वंचित भागातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घ्यावे.
७. माध्यमिक स्तरावर व्यावसायिक अभ्यासक्रम राबवावेत. अभ्यासक्रमाबाबत सविस्तर स्पष्टीकरण पुढील 'ब' भागात दिलेले आहे.
८. किमान अध्ययन क्षमता निर्माण करण्यास प्राधान्य द्यावे.
९. माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा जागृती, स्वतंत्र विचार करण्याची प्रवृत्ती, प्रकल्पांची कार्यवाही करणे, या गुणांचा विकास करून राष्ट्रोपयोगी दृष्टिकोन निर्माण करण्यात यावा.
१०. मूल्यांचे शिक्षण देऊन समाजाचा समतोल विकास साधावा.
११. अंतर्गत, सातत्यपूर्ण व सर्वकष मूल्यमापनाद्वारे विद्यार्थ्यांच्या क्षमता कौशल्ये विकसित करण्यावर भर द्यावा.
१२. माध्यमिक शिक्षणात समाज, स्वयंसेवी संघटना, प्रतिष्ठित व्यक्ती यांचा सहभाग वाढवून शिक्षण ही सामाजिक जबाबदारी आहे हे पटवून द्यावे.

वरील शिफारशींचा अंमलबजावणीनंतर १९८६ नंतरच्या काळात अभ्यासक्रमातील बदलांमुळे माध्यमिक शिक्षणावर पुढील परिणाम झाले.

१. शिक्षणाच्या १० + २ + ३ या समान आकृतीबंधामुळे राष्ट्रीय एकात्मता निर्माण झाली.
२. माध्यमिक शिक्षणात सुधारणा व प्रगती झाली.
३. प्रज्ञावान व सृजनशील विद्यार्थ्यांच्या विचारांना प्रोत्साहन मिळाले.
४. व्यावसायिक अभ्यासक्रमाची संधी निर्माण झाली.
५. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्यास गती प्राप्त झाली.
६. मूल्यशिक्षणामुळे सामाजिक स्थैर्य लाभू लागले.
७. प्रयोगशील नेतृत्व निर्माण होऊ लागले त्यामुळे बालवयातच संशोधन वृत्ती तयार होऊ लागली व भारतीय मुलांची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण झाली.
८. किमान अध्ययन क्षमतेमुळे शिक्षणाची आवड निर्माण झाली.

९. अंतर्गत मूल्यमापनामुळे माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या क्षमतांमध्ये प्रगती व आत्मविश्वास दिसून येऊ लागला.
१०. वंचित भागातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात समाविष्ट केल्यामुळे शिक्षण सर्वोपर्यंत पोहचले.
११. गाभाभूत घटकांच्या समावेशामुळे राष्ट्रीय सांस्कृतिक ओळख सर्वांना झाली.

तरीही या शैक्षणिक धोरणाच्या मर्यादा व कमतरता टीकाकारांनी निदर्शनास आणून दिल्या. त्यामुळे राज्यसभेत त्यावर चर्चा झाली. त्यातून 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६' ची समीक्षा करण्याचे मनुष्यबळ विकास मंत्रालयाने ठरविले व ७ मे, १९९० रोजी पुनरावलोकन समिती नियुक्ती केली. आचार्य राममूर्ती या समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी आपला अहवाल डिसेंबर २६, १९९० रोजी भारत सरकारकडे सादर केला. राममूर्ती पुनरावलोकन समितीने शिक्षणाची कोणती उद्दिष्टे सांगितले व शिफारशी स्पष्ट केल्या याचा अभ्यास पुढील भागात करू.

### राममूर्ती पुनरावलोकन समिती १९९० (प्रबुद्ध मानवी समाजाकडे वाटचाल) :-

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या कार्यवाहीची समीक्षा करणे, सुधारित कालबद्ध धोरण निश्चित करणे या उद्देशाने राममूर्ती पुनरावलोकन समितीची नियुक्ती झाली. या समितीने पुढील उद्दिष्टे निश्चित केली.

### उद्दिष्टे :-

१. शिक्षणातून समता निर्माण करणे.
२. शिक्षणाची गुणवता आणि दर्जा राखणे,
३. राष्ट्रीय एकता, मूल्य शिक्षण आणि चारित्र्यनिर्मितीस प्रेरणा देणे.
४. ग्रामीण शिक्षणाचा दर्जा सुधारणे,
५. योग्य मनुष्यबळाचे नियोजन करणे.

### शिफारशी :-

१. शिक्षणाला विकासाचे साधन बनवावे.
२. भारतीय संस्कृतीवर आधारित शिक्षण योजना तयार करावी.
३. मूल्य शिक्षण म्हणजे व्यक्तिविकासाची प्रक्रिया आहे, त्याकरिता ती स्वीकारावी.
४. सामाजिक समतेसाठी सामान्य शाळांची निर्मिती करावी.
५. शिक्षण विकासाच्या कार्यक्रमाद्वारे प्रदेश, वंचित वर्ग, अनुसूचित जाती, जमाती, स्त्रिया, शैक्षणिक दृष्टिकोनातून मागासलेल्या अल्पसंख्यांक आणि अपंगाचा विकास साधावा.
६. शिक्षणाचे व्यावसायिकीकरण करताना एकेरी प्रवाह शाळा (डळपसश्रश डीशरा`ष एर्वीलरींळेप) सुरू करावी.
७. शिक्षणाच्या सर्व स्तरांवर मुलींचा आणि महिलांचा सहभाग वाढवावा.
८. शिक्षणात प्रादेशिक भाषांना प्रोत्साहन द्यावे.
९. गरीबी आणि श्रीमंतीची दरी संपुष्टात आणण्यासाठी समूह शाळांना प्रेरणा द्यावी.
१०. भविष्यात एकही नवोदय विद्यालय सुरू करू नये.
११. मूलभूत अधिकारात शिक्षणाचा समावेश करावा.
१२. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षणाची गळती रोखण्यास प्रयत्नपूर्वक नव्या योजना तयार कराव्यात.
१३. शिक्षणाचा आशय आणि प्रक्रियेतून भारतीय संस्कृतीमधील विविधतेतून एकता स्पष्ट करावी.
१४. शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा उपयोग शिक्षणासाठी वाढवावा.
१५. शालेय स्तरावर संगणक शिक्षण सुरू करावे.
१६. विद्यार्थ्यांना शालेय दफ्तराचे ओझे होत आहे ते कमी करण्याचा प्रयत्न करावा.
१७. शिक्षण प्रशिक्षणातून शिक्षकी पेशास अनुकूल अभिरूची वाढवावी.
१८. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निःशुल्क शिक्षण द्यावे.

१९. शिक्षणासाठी साधन सामग्रीचा पुरवठा करावा.

वरील शिफारशींची अंमलबजावणी करण्यापूर्वीच राजकीय बदलामुळे या शिफारशींकडे पूर्ण दुर्लक्ष झाले. तरीही पुढील जनार्दन समिती व अन्य धोरणांनी या शिफारशींचा आढावा घेतलेला आढळतो. राममूर्ती समितीने शैक्षणिक खर्चासाठी स्रोत्र स्पष्ट केले. शिक्षणात नैतिकमूल्य संस्कृती बिंबविण्यावर भर दिला होता. मानवी क्षमतांचा विकास शिक्षणातून करण्यास प्राधान्य दिले होते.

## राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० :-

शालेय आणि उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात परिवर्तनात्मक सुधारणांना यात मोठा वाव देण्यात आला आहे. २१ व्या शतकातले हे पहिले शिक्षण धोरण असून हे ३४ वर्ष जुन्या १९८६ च्या शिक्षणावरच्या राष्ट्रीय धोरणाच्या जागेवर आले आहे. सर्वांना संधी, निःपक्षपात, दर्जा, परवडणारे आणि उत्तरदायित्व या स्तंभावर याची उभारणी करण्यात आली आहे २०३० च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी याची सांगड घालण्यात आली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण अधिक समग्र, बहू शाखीय २१ व्या शतकाच्या गरजाना अनुरूप करत भारताचे चैतन्यशील प्रज्ञावंत समाज आणि जागतिक ज्ञान महासत्ता म्हणून परिवर्तन घडवण्याचा आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या आगळ्या क्षमता पुढे आणण्याचा या धोरणाचा उद्देश आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या २९ जुलै २०२० रोजीच्या बैठकीमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी देण्यात आली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० हे मुख्यतः ५ स्तंभावर आधारीत आहे.

१) Access ( सर्वांना सहज शिक्षण)

२) Equity (समानता)

३) Quality (गुणवत्ता)

४) Affordability (परवडणारे शिक्षण)

५) Accountability (उत्तरदायित्व).

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये पूर्वीच्या १०+२+३ या रचनेमध्ये बदल करून ५+३+३+४ याप्रमाणे रचनात्मक बदल केला आहे. यामध्ये पायाभूत स्तरापासून पदवी स्तरांपर्यंतच्या शिक्षणाचा समावेश केला आहे. या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आंतर विभागीय समिती गठीत करण्यात आली आहे.

## नवीन शैक्षणिक धोरणाचे महत्वाचे मुद्दे :-

भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे अंतिम उद्दीष्ट आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय ठेवले गेले. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील शिक्षण प्रणालीतील हा तिसरा मोठा बदल आहे. एनईपी २०२० च्या पूर्वी १९६८, १९८६ व १९९० मध्ये शैक्षणिक यंत्रणेत सुधारणा झाली. शालेय शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लाक्षणिक वाढ करणे नवनवीन उपक्रम राबविणे. इसवी सन २०२५ पर्यंतपाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व तंत्रज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेणे. शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे.

## शिक्षक कसा असेल? :-

शाखांनी सुसज्ज असलेल्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये स्तरानुसार व विषयवार राबवण्यात येणारा एकीकरण केलेला चार वर्षाचा बॅचलर ऑफ एज्युकेशन हा अभ्यासक्रम शिक्षकांना पूर्ण करणे गरजेचे आहे. शिक्षक होण्याचा हा प्रमुख मार्ग असेल. दुय्यम दर्जाच्या व अकार्यक्षम शिक्षक शिक्षण संस्था बंद करण्यात येतील.

## नॅशनल रिसर्च फाउंडेशन :-

नवसंशोधनाच्या कल्पना वेगाने देशभर वितरित व्हाव्यात यासाठी 'नॅशनल रिसर्च फाउंडेशन'ची स्थापना करण्यात येईल. या धोरणाच्या माध्यमातून सर्वच भारतीय भाषांचे संवर्धन वृद्धी व चैतन्य अबाधीत राहील.

### राष्ट्रीय शिक्षण आयोग National Education Commission :-

राष्ट्रीय शिक्षण आयोग पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग किंवा नॅशनल एज्युकेशन कमिशन ची स्थापना करण्यात येईल. हा आयोग भारतातील शैक्षणिक दूरदृष्टीचा परिरक्षक असेल. सन २०३० पर्यंत पूर्व-शाळा ते माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण १००% ग्रॉस एनरोलमेंट रेश्यो (जीईआर) सह सार्वत्रिक केले गेले आहे.

१० + २ ची सद्य शिक्षण प्रणाली नवीन व सुधारित ५ + ३ + ३ + ४ रचनेद्वारे अनुक्रमे ३-८, ८ -११, ११-१४, आणि १४ -१८ वयोगटातील परस्पर बदलली जाईल. या प्रणालीमध्ये १२ वर्षांचे शिक्षण तीन वर्ष अंगणवाडी / पूर्व-शालेय शिक्षणासह असेल. दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा अधिक सुलभ केल्या जातील आणि तथ्ये शिकण्याऐवजी मुख्य कार्यक्षमतेवर अधिक भर दिला जाईल. सर्व विद्यार्थ्यांना या परीक्षा दोनदा घेण्यास परवानगी दिली जाईल. शाळांमधील शैक्षणिक प्रवाह, अवांतर क्रिया आणि व्यावसायिक प्रवाह यांच्यात कोणतेही कठोर वेगळेपणा असणार नाही. इयत्ता सहावीपासून इंटर्नशिपसह व्यावसायिक शिक्षणाची तरतूद. मातृभाषा / प्रादेशिक भाषा ५ वी पर्यंत शिक्षण देण्यासाठी वापरली जाईल आणि कोणत्याही विद्यार्थ्यावर कोणतीही भाषा कठोरपणे लादली जाणार नाही. शिक्षकांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम (एनसीएफटीई) एनसीईआरटीशी सल्लामसलत करून राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एनसीटीई) द्वारा प्रोग्राम केले जाईल. ४ वर्षे एकात्मिक बी.एड. २०३० पर्यंत पदवी अभ्यासक्रम अध्यापनासाठी किमान पदवी पात्रता असेल.

### उच्च शिक्षण

### Higher education From new National Education Policy २०२० :-

अंडरग्रेजुएट कोर्स ३ ते ४ वर्षांच्या लवचिक अभ्यासक्रमासह एकाधिक एक्झिट ऑप्शन्ससह आणि वेगवेगळ्या स्तरावर प्रमाणपत्रांसह दिले जातील. एम.फिल अभ्यासक्रम बंद केले जातील. वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता संपूर्ण उच्च शिक्षणासाठी ‘उच्च भारतीय शिक्षण आयोग’ क्ळसहशी एर्वीलरींळेप ऊेाळीीळेप`ष खपवळर’ (क्एउख) (एचईसीआय) ची स्थापना केली जाईल. सार्वजनिक आणि खासगी दोन्ही उच्च शिक्षण संस्था समान निकषांद्वारे संचालित केल्या जातील. एचईसीआय मध्ये चार स्वतंत्र विभाग असतील उदा.

१) नियामक चौकटीची देखभाल करण्यासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद (एनएचईआरसी).
२) सर्वसाधारण शैक्षणिक परिषद (जीईसी) मानक सेटिंग्ज देखरेखीसाठी.
३) वित्तपुरवठा करण्यासाठी उच्च शिक्षण अनुदान परिषद (एचईजीसी).
४) अधिकृत मान्यता मिळवण्यासाठी नॅशनल क्रिडिटी कौन्सिल (एनएसी)

१५ वर्षात महाविद्यालयांची संलग्नता प्रणाली पुसून टाकली जाईल आणि महाविद्यालयांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याची यंत्रणा राबविली जाईल. भविष्यात प्रत्येक महाविद्यालयाचा स्वायत्त पदवी देणारा महाविद्यालय किंवा विद्यापीठाचा घटक म्हणून विकसित होणे अपेक्षित आहे.

### समारोप :-

एकंदरीत नवीन शैक्षणिक धोरण सर्वांसाठी प्रवेश योग्य आणि न्याय शिक्षणासाठी सर्वांगीण लवचिक आणि तंत्रज्ञान-सक्षम दृष्टिकोनाला चालना देवून भारतातील शिक्षणामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी तयार करण्यात आले आहे. हे शिक्षणातील गुणवत्ता, उत्तरदायित्व आणि संशोधनाच्या महत्वावर तसेच सर्व विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेच्या शिक्षणाची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी शिक्षक व्यावसायिक विकासामध्ये गुंतवणूक करण्याची आवश्यकता यावर जोर देते.

### संदर्भ :-

१) डॉ. सदानंद भिलेगांवकर, प्रा. स्मिता भिलेगांवकर- माध्यमिक शिक्षणाची कार्यपद्धती, नित्यनूतन प्रकाशन, नोव्हेंबर २००६.
२) प्रा. गाजरे, प्रा. चिटणीस, डॉ. पाटील- शिक्षणाचे अधिष्ठान, नित्यनूतन प्रकाशन, सप्टेंबर २००६.